| | | | |
|---|---|---|---|
| MHKO100004812021 | दाखल दिनांक | :- | २९/०७/२०२१ |
| | नोंदणी दिनांक | :- | ०२/०८/२०२१ |
| | निकाल दिनांक | :- | ०२/०७/२०२६ |
| | कालावधी | :- | वर्ष महिने दिवस |
| | | | ०४ ११ ०३ |

**नियमीत फौजदारी खटला क्र.९७/२०२१** **निशाणी क्र.१७/ब.**
CNR NO. MHKO100004812021.

**फॉर्म क्र.३२**
**भाग 'अ'**
**( निकालाचे शिर्षक पृष्ठ )**
(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (i) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| **गडहिंग्लज येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.३, ता. गडहिंग्लज, जि.कोल्हापूर यांचे न्यायालयात**<br>**(पिठासीन अधिकारी : एस. डी. मेहता )**<br>न्यायनिर्णय घोषीत दिनांक – ०२ जुलै, २०२६<br>**(नियमीत फौजदारी खटला क्र. ९७/२०२१)** | | |
| गुन्हा नोंद क्र.११८/२०२१, दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, गडहिंग्लज. | | |
| **फिर्यादी / तक्रारदार** | :- | **महाराष्ट्र शासन,**<br>मार्फत दुय्यम निरीक्षक,<br>राज्य उत्पादन शुल्क, गडहिंग्लज. |
| **अभियोग पक्षातर्फे** | :- | सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस. डी. मोरे. |
| **आरोपी** | :- | **सागर लक्ष्मण कांबळे.**<br>वय वर्ष - ३१, व्यवसाय – शेती,<br>रा. जरळी, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर. |
| **आरोपीतर्फे विधीज्ञ** | | **श्री. ए. बी. शिंत्रे.** |

**भाग-ब**
(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :- | २६/०६/२०२१ |
| फिर्याद दाखल दिनांक | :- | २९/०७/२०२१ |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :- | ०२/०४/२०२४ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :- | १०/०२/२०२५ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :- | ०२/०७/२०२६ |

| | | |
|---|---|---|
| न्यायनिर्णय दिनांक | :- | ०२/०७/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :- | आरोपीस निर्दोषमुक्त करण्यात येते. |

**आरोपीची माहिती**

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडलेचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (Set Off) करणेबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सागर लक्ष्मण कांबळे | दि.२६/०६/२०२१ रोजी सी.आर.पी.सी. ४१ अ प्रमाणे नोटीस | दि.२६/०६/२०२१ रोजी सी.आर.पी.सी. ४१ अ प्रमाणे नोटीस | म.दा.कायदा कलम ६५ (ई) प्रमाणे. | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

**भाग-क**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

**सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे /न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोग पक्ष**

| सा.क्रं. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| १. | भैरू मारूती नाईक. | घटनास्थळ पंच. | ९ |

**क. अभियोग पक्षातर्फे निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्र. | निशाणी | वर्णन |
|---|---|---|
| १. | १० | घटनास्थळ व जप्ती पंचनामावरील पंचाची सही. |

## न्या य नि र्ण य

(दिनांक ०२/०७/२०२६ रोजी घोषित केला)

प्रस्तुत प्रकरणात आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) अन्वये दोषारोप ठेवून खटला चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणेः-**

०२. दिनांक २६/०६/२०२१ रोजी सायंकाळी १७.३० वाजताचे सुमारास मौजे जरळी, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर येथे आरोपी बिगर परवाना, बेकायदा जुन्या वापरत्या पिशवीमध्ये महाराष्ट्र राज्य निर्मित देशी दारु पहिली धार संत्राच्या १८० मिलीच्या ३८ सिलबंद बाटल्या व आंबूस उग्र वासाचे दोन स्टीलचे ग्लास विक्री करण्याच्या उद्देशाने स्वतःजवळ बाळगलेल्या स्थितीत मिळून आला. म्हणुन, आरोपीविरुध्द राज्य उत्पादन शुल्क, गडहिंग्लज येथे तक्रार नोंदविण्यात आली.

०३. सदर तक्रारीवरुन राज्य उत्पादन शुल्क, गडहिंग्लज येथे गु.र.क्र. ११८/२०२१, महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला. दूय्यम निरीक्षक, श्री. जी. एन. गुरव यांनी सदर गुन्ह्याचा तपास केला. तपास पूर्ण झाल्यानंतर तपासी अधिकारी यांनी आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

०४. माझे पूर्व पिठासिन अधिकारी यांनी आरोपीविरुध्द निशाणी क्र.०७ अन्वये महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) अन्वये दोषारोप नोंदवून आरोप निश्चित केला. सदरचा दोषारोप आरोपीस वाचून व समजावून सांगितला. आरोपीने गुन्हा नाकबूल करुन संपरीक्षेची मागणी केल्याने खटल्याची पुढील संपरिक्षा करण्यात आली.

०५. अभियोग पक्षातर्फे आरोपीवरील दोषारोप सिध्द करण्यासाठी एकाच साक्षीदाराची साक्ष नोंदविण्यात आली. अभियोग पक्षाने सादर केलेल्या पुराव्यामध्ये आरोपीविरुध्द परिस्थिती विशेष खुलासा करण्यासाठी आवश्यक पुरावा अभिलेखावर न आल्याने आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) अन्वये निवेदन नोंदविण्यात आले नाही.

०६. अभियोग पक्षातर्फे श्री. एस. डी. मोरे, सहा. सरकारी अभियोक्ता व आरोपीचे वकील श्रीमती. ए. बी. शिंत्रे यांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखातील साक्षीपुराव्यावरुन खालील प्रश्न खटल्याच्या विचारार्थ उपस्थित झाल्याने त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसहीत खालीलप्रमाणे नोंदविले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक २६/०६/२०२१ रोजी सायंकाळी १७.३० वाजताचे सुमारास मौजे जरळी, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर येथे आरोपी बिगर परवाना, बेकायदा स्वतःचे फायदयाकरीता जुन्या वापरत्या पिशवीमध्ये महाराष्ट्र राज्य निर्मित देशी दारु पहिली धार संत्राच्या १८० मिलीच्या ३८ सिलबंद बाटल्या व आंबूस उग्र वासाचे दोन स्टीलचे ग्लास विक्री करण्याच्या उद्देशाने स्वतःजवळ बाळगलेल्या स्थितीत मिळून आला असे अभियोग पक्ष सिध्द करतो का ? | **नाही.** |
| २. | आदेश काय ? | **आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते.** |

## कारणमिमांसा

**प्रश्न क्र.१ बाबत -**

०७. अभियोगपक्षाने सदर प्रकरणामध्ये आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरीता एकच पंच साक्षीदारास तपासले परंतु त्यांनी अभियोग पक्षास सहकार्य केले नाही आणि त्यांना फितुर घोषित केले. प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादी आणि तपासी अधिकारी यांना वेळोवेळी समन्स काढण्यात आले परंतु त्याची बजावणीचा रिपोर्ट अभिलेखावर सादर करण्यात आला नाही. अभियोग पक्ष इतर साक्षीदारांना हजर करु शकला नाही. म्हणुन त्यांचा पुरावा दिनांक ०२/०७/२०२६ रोजी बंद करण्यात आला. अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता आणि आरोपीतर्फे अधिवक्ता यांचे युक्तीवाद ऐकले तसेच अभियोगपक्षाने दाखल केलेला पुरावा वाचला.

०८. प्रस्तुत प्रकरणात आरोपीविरुध्द गुन्हा सिध्दतेकामी आवश्यक असलेला रासायनिक विश्लेषण अहवाल या न्यायालयासमोर अभियोगपक्षाने दाखल केलेला आहे. मात्र वर उल्लेख केल्याप्रमाणे ज्या साक्षीदारासमक्ष आरोपीच्या ताब्यातून सदर मुद्देमाल जप्त करण्यात आला होता त्या साक्षीदाराला अभियोग पक्षाने तपासले, परंतु त्यांनी अभियोग पक्षास सहकार्य होईल अशी साक्ष दिली नाही. आणि फितुर घोषित झालेले आहे म्हणुन सदर जप्त मुद्देमाल आरोपीचे ताब्यातून जप्त केला व सदर दाखल रासायनिक विश्लेषण अहवाल त्याबाबतचा आहे अथवा कसे यावर शंका निर्माण होते. तसेच, ज्या साक्षीदाराने सदर जप्त मुद्देमाल पोलीस ठाण्यापासून

ते रासायनिक प्रयोगशाळेपर्यंत वाहून नेला त्याची देखील साक्ष तपासलेली नाही. त्यामुळे, तपासणीसाठी पाठविलेला मुद्देमाल आरोपीच्याच ताब्यातून जप्त करण्यात आला होता व तोच रासायनिक प्रयोगशाळेत पाठविणेत आला ही महत्त्वाची बाब सबळ पुराव्यानिशी सिध्द झालेली नाही. अन्य पुराव्यातून देखील आरोपीच्या ताब्यातून मुद्देमाल मिळून आला हे अभिलेखावर आलेले नाही. सबब, आरोपीच्या ताब्यातून सदरचा मुद्देमाल मिळून आला ही बाब सिध्द होऊ शकली नाही.

०९. त्याचप्रमाणे, आरोपीच्या ताब्यातून सदर मुद्देमाल ज्या पंचांसमक्ष जप्त करण्यात आला होता त्या घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यावरील पंच फितुर घोषित झालेले आहेत त्यामुळे, जप्त मुद्देमाल दारुच होती हे सिध्द झालेले नाही. त्याचप्रमाणे, सदर गुन्ह्यातील फिर्यादी व तपासी अधिकारी यांना वेळोवेळी समन्स काढून देखील ते न्यायालयात हजर झाले नाहीत, त्यामुळे अभियोगपक्षास त्यांचा पुरावा नोंदविता आला नाही. पंच साक्षीदाराने घटनास्थळ व जप्ती पंचनामा सिध्द करण्यास उपयोगी अशी साक्ष न्यायालयासमोर न दिल्यामुळे सदरचा घटनास्थळ व जप्ती पंचनामा पुराव्यात सिध्द झालेला नाही. अन्य पुराव्यातून देखील आरोपीच्या ताब्यातून वर नमुद मुद्देमाल मिळून आला हे अभिलेखावर आलेले नाही. सबब, आरोपीच्या कब्ज्यातून सदरचा मुद्देमाल मिळून आला ही बाब सिध्द होऊ शकली नाही.

१०. वरील सर्व कारणांचा विचार करता आरोपी त्याचे ताब्यात विनापरवाना बेकायदा जुन्या वापरत्या पिशवीमध्ये महाराष्ट्र राज्य निर्मित देशी दारु पहिली धार संत्राच्या १८० मिलीच्या ३८ सिलबंद बाटल्या व आंबूस उग्र वासाचे दोन स्टीलचे ग्लास विक्री करण्याच्या उद्देशाने स्वतःजवळ बाळगलेल्या स्थितीत मिळून आला हे दोषारोप निःसंशयपणे तसेच सबळ पुराव्यानिशी सिध्द करण्यास अभियोगपक्षास अपयश आले आहे या निष्कर्षाप्रत हे न्यायालय आले आहे. परिणामी, प्रश्न क्र.१ चे उत्तर 'नकारार्थी' नोंदविण्यात येत आहे.

**<u>प्रश्न क्र.२ साठी</u> -**

११. वरील विवेंचनेच्या अनुषंगाने प्रश्न क्र.१ चे उत्तर नकारार्थी असल्याने आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सबब, प्रश्न क्र.२ चे उत्तरार्थ खालीलप्रमाणे

आदेश करण्यात येत आहे.

## आ दे श

**१.** आरोपी **सागर लक्ष्मण कांबळे** यांची महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५(ई) च्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

**२.** आरोपीचे जामीन व बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

**३.** जप्त मुद्देमाल जुन्या वापरत्या पिशवीमध्ये महाराष्ट्र राज्य निर्मित देशी दारु पहिली धार संत्राच्या १८० मिलीच्या ३८ सिलबंद बाटल्या व आंबूस उग्र वासाचे दोन स्टीलचे ग्लास अपील कालावधी समाप्तीनंतर नियमाप्रामाणे योग्य त्या विल्हेवाटीकरीता अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गडहिंग्लज यांचेकडे पाठविण्यात यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)

SACHIN DURGASHANKAR MEHTA

Digitally signed by SACHIN DURGASHANKAR MEHTA
Date: 2026.07.02 17:38:14 +0530

दिनांकः ०२/०७/२०२६.
गडहिंग्लज.

**( एस. डी. मेहता )**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.३, गडहिंग्लज.